ePaper
| वर्ष - 9 । अंक -135 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
www.mahaenews.com । गुरुवार, दि. 8 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## अपंगांच्या कल्याणासाठी तुकाराम मुंढे ॲक्शन मोडवर



### आतील पानांत


- फाफ डू प्लेसिसने मोडला वर्ल्ड रेकॉर्ड
- सचिनचा लेक बोहल्यावर चढणार
- व्हेनेझुएलानंतर इराण ठरणार लक्ष्य?
- उद्योग-व्यवसायात बेंगळुरू अव्वल


**घोटाळ्यावरून आरोप-प्रत्यारोप** भाजप आमदार महेश लांडगे यांचा घणाघात

# भ्रष्टाचाराचे आका अजित पवार!

## पिंपरी-चिंचवडमधील भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून अजित पवार–महेश लांडगे आमनेसामने

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवड महापालिकेतील कथित भ्रष्टाचारावरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजप आमदार महेश लांडगे यांच्यातील आरोप-प्रत्यारोप आता शिगेला पोहोचले आहेत. अजित पवार यांनी "महापालिकेतील भ्रष्टाचाराचा 'आका' संपवायचा आहे," असा इशारा दिल्यानंतर भाजप आमदार महेश लांडगे यांनी थेट पलटवार करत "महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचे खरे आका अजित पवारच आहेत," असा गंभीर आरोप केला आहे. यामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, पिंपरी-चिंचवडचे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.**





- **पिंपरी-चिंचवडमध्ये राजकीय तापमान वाढले**
- **अजित पवारांच्या टीकेला भाजप आमदार महेश लांडगे यांचे जोरदार प्रत्युत्तर**
- **'पुराव्यानिशी आरोप करू' असा इशारा**

भाजप आमदार महेश लांडगे यांनी माध्यमांशी बोलताना अजित पवारांवर सडकून टीका केली. "70 हजार कोटींच्या कथित घोटाळ्याचे आरोप अजित पवारांवर पूर्वीपासून आहेत. अशा व्यक्तीने इतरांवर भ्रष्टाचाराचे आरोप करणे म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा," असा घणाघात त्यांनी केला. "आम्हीही पुराव्यानिशी आरोप करू, मात्र ते आरोप अजित पवारांना सहन होणार नाहीत," असा थेट इशाराही लांडगे यांनी दिला.

अजित पवार सध्या चिडचिड करत असल्याचा आरोप करत लांडगे म्हणाले, "उमेदवारी मागायला कुणी येत नसल्यामुळे अजित पवार अस्वस्थ झाले आहेत. चिठ्ठी वाचून स्क्रिप्टेड भाषण करणे ही त्यांची जुनी सवय आहे. त्यांच्याकडे मोठे डायरेक्टर आणि चाणक्य असतील, मात्र बिनबुडाचे आरोप करून जनतेची दिशाभूल करू नये." अजित पवारांच्या वक्तव्यांवर टीका करत त्यांनी त्यांना थेट आव्हान दिले.

1991 पासून अजित पवार पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात सक्रिय असल्याचा उल्लेख करत लांडगे म्हणाले, "ते कायम सत्तेत राहिले. पाच वेळा उपमुख्यमंत्री झाले, पुणे जिल्ह्याचे तब्बल 25 वर्षे पालकमंत्री राहिले. एवढी मोठी सत्ता हातात असताना त्यांनी नेमकं काय केलं, हा खरा प्रश्न आहे. उंटावर बसून शेळ्या हाकण्याचंच काम त्यांनी केलं," अशी टीका करत त्यांनी अजित पवारांच्या कार्यकाळावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आपल्या संपत्तीवर होत असलेल्या टीकेलाही लांडगे यांनी उत्तर दिले. "माझ्या संपत्तीवर बोलण्याऐवजी अजित पवारांनी स्वतःची जुनी आणि सध्याची परिस्थिती पाहावी. गेल्या अनेक वर्षांत त्यांची संपत्ती कशी वाढली, हे जनतेला माहीत आहे," असे सांगत त्यांनी अजित पवारांच्या वैयक्तिक संपत्तीचा मुद्दाही उपस्थित केला.

यावेळी महेश लांडगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सद्यस्थितीवरही टीका केली. "अजित पवारांनी नेहमीच स्थानिक भूमिपुत्रांना डावलले. कुणालाही मोठं होऊ दिलं नाही. आज राष्ट्रवादीची अवस्था अत्यंत बिकट आहे. त्यांना 128 उमेदवारही मिळाले नाहीत. स्वतःचं झाकून ठेवायचं आणि दुसऱ्याचं वाकून पाहायचं हीच त्यांची वृत्ती आहे," असा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, या वादाची ठिणगी अजित पवारांच्या वक्तव्यामुळे पडली होती. "महानगरपालिकेत भ्रष्टाचार करणाऱ्या आकाला संपवायचं आहे. त्या आकाला जागा दाखवायची आहे," असे म्हणत अजित पवार यांनी नाव न घेता आमदार महेश लांडगे यांच्यावर टीका केली होती. "मी कोणाच्या नादी लागणार नाही. मात्र विनाकारण माझ्या नादाला कोणी लागले, तर सोडणार नाही," असेही त्यांनी ठणकावून सांगितले होते. अजित पवार यांनी भाजपवर गंभीर आरोप करताना महापालिकेच्या कारभारावरही बोट ठेवले होते. "भाजपने महापालिका कर्जबाजारी केली आहे. ठेवी मोडल्या आहेत. 40 हजार कोटी रुपयांची कामे कुठे झाली, याची उत्तरे द्यावीत," असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. "त्याला नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष केले. स्थायी समितीत काय करायचे ते केले आणि तो आमदार झाला. आता त्याची संपत्ती कशी वाढली, दादागिरी किती वाढली," अशी टीकाही अजित पवारांनी नाव न घेता महेश लांडगे यांच्यावर केली होती.

महेश लांडगेंच्या टीकेला उत्तर देताना अजित पवार म्हणाले, "मी कोण आहे हे जनता ठरवेल. 15 तारखेपर्यंत कळ काढा, मी उत्तर देतो." तसेच राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुरू करण्यात येणाऱ्या 'एक अलार्म – पाच कामे' या कॅम्पेनची माहिती देत त्यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील खड्डे, कचरा, वाहतूक कोंडी, पाणीटंचाई आणि गुन्हेगारी या मुद्द्यांवर भाजपच्या कारभारावर टीका करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

### काय म्हणाले अजित पवार?

महेश लांडगेंच्या टीकेवर बोलताना अजित पवार म्हणाले की, मी कोण आहे जनता ठरवेल. 15 तारखेपर्यंत कळ काढा उत्तर देतो असे अजित पवार म्हणाले. राष्ट्रवादीकडून एक अलार्म पाच काम हे कँपेन सुरू होत आहे. पुण्यातील खड्डे, कचरा , गुन्हेगारी, पाणीटंचाई या मुद्द्यांवर रॅप सॉंगमधून भाजपच्या कारभारावर टीका करण्यात आली आहे. हे गाणं पुणे आणि पिंपरी चिंचवडच्या कारभाराबद्दल आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या कारभाराबाबत हे नसल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. कचरा , वाहतूक कोंडी, तुटलेले रस्ते, पाणीटंचाई , गुन्हेगारी हे पुण्याचे अलार्म आहेत असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले. आपण जे गाणं तयार केलं आहे ते पुणे आणि पिंपरी चिंचवडपुरते मर्यादित आहे. केंद्र आणि राज्य सरकार याचा कुठेही संबंध नाही असे अजित पवार म्हणाले. पालिकेत मोजक्याच लोकांना टेंडर दिले जाते त्याचा फटका नागरिकांना बसतो असेही अजित पवार म्हणाले.

खड्ड्यांच्या समस्या कायम

पुण्याच्या प्रश्नांवरून अजितदादांनी मित्रपक्षालाच घेरलं

# 'नऊ वर्षांत 75 हजार कोटी खर्च

। पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महापालिकेत ज्यांची सत्ता होती. त्यांनी तब्बल ७५ हजार रुपये कोटी खर्च केला. मात्र, पुण्यात ठोस विकासकामे दिसत नाही. रस्त्यांची दुरवस्था झाली. कचऱ्याचे ढीग, पिण्याच्या पाण्याचा तुटवडा, प्रदूषण अशा समस्या शहरात आहेत. विकासकामांसाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले. मात्र, विकास कुठे दिसतो का ?', असा सवाल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी उपस्थित केला.**

## "मी बेछूट आरोप करत नाही!



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या प्रभाग क्रमांक २२ आणि २३ मधील उमेदवारांच्या प्रचारासाठी बुधवारी सभेचे आयोजन करण्यात आले. सोमवार पेठेतील नरपतगिरी चौकात झालेल्या सभेत पवार यांनी शहरातील विकासकामांवर प्रश्न उपस्थित करून महायुतीतील मित्रपक्ष भारतीय जनता पक्षाला कानपिचक्या दिल्या.'पुणे शहरातील वाहतूक समस्या दिवसेंदिवस जटील होत चालली आहे. वाहतूक कोंडीत जागतिक स्तरावर पुणे चौथ्या क्रमांकावर आहे. ज्यांच्या हाती सत्ता होती त्यांनी वाहतूकविषयक सुधारणा केल्या नाहीत. वाहतूक कोंडी सोडविण्यात त्यांना अपयश आले. शहरात १२ हजार ५० सफाई कर्मचारी आहे. सफाई कर्मचारी जागेवर दिसत नाहीत. काहींशी संपर्क साधला तेव्हा शहराबाहेर असल्याचे समजले. काहींनी सफाई काम करत नसल्याचे सांगितले. बनावट नावे वापरून सफाई कर्मचाऱ्यांच्या नावावर कोट्यवधी रुपयांचा अपहार केला. याबाबतची कागदपत्रे आणि पुरावे आपल्याकडे आहेत', असा आरोप पवार यांनी केला.'मी कधीही बेछूट आरोप करत नाही. पुराव्यांशिवाय बोलत नाही. समाजाच्या भल्यासाठी मी काम करतो. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी बदल घडविणे आवश्यक आहे. लोकसभा, विधानसभा, महापालिका निवडणूक वेगवेगळ्या असतात. महापालिकेची सत्ता कोणाच्या हातात द्यायची, हे ठरविण्यासाठी ही निवडणूक आहे. बाहेरचे लोक येऊन आश्वासने देतील.

### मी पुराव्यांशिवाय बोलत नाही

काहींशी संपर्क साधला तेव्हा शहराबाहेर असल्याचे समजले. काहींनी सफाई काम करत नसल्याचे सांगितले. बनावट नावे वापरून सफाई कर्मचाऱ्यांच्या नावावर कोट्यवधी रुपयांचा अपहार केला. याबाबतची कागदपत्रे आणि पुरावे आपल्याकडे आहेत', असा आरोप पवार यांनी केला.'मी कधीही बेछूट आरोप करत नाही. पुराव्यांशिवाय बोलत नाही. समाजाच्या भल्यासाठी मी काम करतो. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी बदल घडविणे आवश्यक आहे. ल

मी पुणेकर आहे. पुणेकरांचे प्रश्न आणि शहराचा विकासासाठी प्रयत्न करणार आहे,' असे त्यांनी नमूद केले.पुणे महापालिकेत ज्यांची सत्ता होती. त्यांनी तब्बल ७५ हजार रुपये कोटी खर्च केला. मात्र, पुण्यात ठोस विकासकामे दिसत नाही. रस्त्यांची दुरवस्था झाली. कचऱ्याचे ढीग, पिण्याच्या पाण्याचा तुटवडा, प्रदूषण अशा समस्या शहरात आहेत. विकासकामांसाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले. मात्र, विकास कुठे दिसतो का ?', असा सवाल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी उपस्थित केला. २२ आणि २३ मधील उमेदवारांच्या प्रचारासाठी बुधवारी सभेचे आयोजन करण्यात आले. सोमवार पेठेतील नरपतगिरी चौकात झालेल्या सभेत पवार यांनी शहरातील विकासकामांवर प्रश्न उपस्थित करून महायुतीतील मित्रपक्ष भारतीय जनता पक्षाला कानपिचक्या दिल्या.'पुणे शहरातील वाहतूक समस्या दिवसेंदिवस जटील होत चालली आहे. वाहतूक कोंडीत जागतिक स्तरावर पुणे चौथ्या क्रमांकावर आहे. ज्यांच्या हाती सत्ता होती त्यांनी वाहतूकविषयक सुधारणा केल्या नाहीत. वाहतूक कोंडी सोडविण्यात त्यांना अपयश आले. शहरात १२ हजार ५० सफाई कर्मचारी आहे. सफाई कर्मचारी जागेवर दिसत नाहीत.

# अपंगांसाठी तुकाराम मुंढे ॲक्शन मोडवर

## तुकाराम मुंढे यांनी अपंगांसाठी 'शीघ्र हस्तक्षेप' धोरण राबवण्याचे जाहीर केले

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'अपंगांसाठीच्या विशेष शाळांमध्ये तीन ते सहा वर्ष वयोगटातील मुलांसाठी 'शीघ्र हस्तक्षेपा'च्या सूचना शाळा संहितेत आहेत. दुर्दैवाने त्याचे पालन होत नाही,' अशी कबुली राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी बुधवारी दिली.**




'विभागाकडे निधीची कमतरता नाही. प्रश्न दृष्टिकोनाचा आहे. सध्या ६ ते १८ वर्ष वयोगटातील अपंगांकडे सर्वाधिक लक्ष देण्यात येते. मात्र, शून्य ते ६ या वयोगटात अधिक काम करण्याची गरज असते. त्यासाठी लवकर निदान आणि सर्वसमावेशक उपचारांसाठी प्रयत्न करणारे असून, 'शीघ्र हस्तक्षेप' धोरण तयार करण्यात येत आहे,' असेही त्यांनी स्पष्ट केले.नॅशनल कन्व्हेन्शन ऑफ एज्युकेटर्स ऑफ द डीफ (एनसीईडी) आणि अली यावर जंग राष्ट्रीय वाणी व श्रवण दिव्यांगजन संस्थेच्या वतीने 'दिव्यांगतेच्या दृष्टिकोनातून व संशोधनाच्या आधारे समावेशक शिक्षण' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.ली यावर जंग राष्ट्रीय वाणी व श्रवण दिव्यांगजन संस्थेचे संचालक डॉ. सुमन कुमार, 'एनसीईडी'च्या अध्यक्षा डॉ. मीरा सुरेश, 'कॉक्लिआ' संस्थेचे मुख्य विश्वस्त डॉ. अविनाश वाचासुंदर, 'एनसीईडी' महाराष्ट्र शाखेच्या अध्यक्षा शुभदा बुर्डे, शिक्षण विभागप्रमुख डॉ. गायत्री आहुजा, शिल्पी नारंग या वेळी उपस्थित होते. 'दिव्यांग कल्याण विभागाचे १५०० कोटी रुपयांचे बजेट आहे. त्यातील सुमारे ११०० कोटी रुपये विशेष शाळांसाठी खर्च केले जातात. त्यामुळे निधीचा प्रश्न नाही. अपंगांच्या कल्याणासाठी दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. त्यांना सहानुभूती नाही, तर संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात.

### विशेष शाळा हे केवळ साधन

दिव्यांग हक्क अधिनियमाचा हा उद्देश प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यात अपयश आल्याचेही त्यांनी मान्य केले.मुंढे म्हणाले, 'अपंग विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष शाळा हे केवळ साधन आहे. मात्र, विशेष शाळांमधून मुख्य प्रवाहात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फारशी समाधानकारक नाही. हे केवळ शिक्षक किंवा त्या संस्थेचे अपयश नसते, तर ती संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी असते.''अपंगांच्या कल्याणासाठी विविध विभागांमध्ये समन्वय, संस्थात्मक सहकार्य, उत्तरदायित्वाची स्पष्ट चौकट आणि पारदर्शक प्रशासन व्यवस्था आवश्यक आहे.

पोलिसांच्या वार्षिक कामगिरीचा आढावा | सातत्याने राबवण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक कारवायांमुळे

# पिंपरी-चिंचवडमधील गुन्हेगारीत लक्षणीय घट!

## पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे : नागरिकांच्या सहभागामुळे शहर अधिक सुरक्षित

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मागील तीन वर्षांत सातत्याने राबवण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक कारवायांमुळे पिंपरी-चिंचवड शहरातील गुन्हेगारीत लक्षणीय घट झाल्याची माहिती पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिली. संघटित गुन्हेगारी, अवैध धंदे, शरीराविरुद्धचे आणि मालमत्तेविरुद्धचे गुन्हे रोखण्यासाठी मोका, तडीपारी, स्थानबद्ध कारवाया तसेच 'व्हिजिबल पोलिसिंग'वर भर देण्यात आल्यामुळे शहर अधिक सुरक्षित बनत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**



### अवैध धंद्यांवर मोठी कारवाई, मोका, तडीपारी, स्थानबद्ध कारवाया, व्हिजिबल पोलिसिंग आणि १६ कोटींचा मुद्देमाल जप्त

पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या वार्षिक कामगिरीचा आढावा घेण्यासाठी बुधवारी (७ जानेवारी) निगडी येथील पोलीस मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत आयुक्त चौबे बोलत होते. यावेळी सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, अपर पोलीस आयुक्त बसवराज तेली, सर्व पोलीस उपायुक्त व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पोलीस आयुक्त चौबे म्हणाले, "मागील वर्षात ४५ संघटित गुन्हेगारी टोळ्यांमधील २१३ आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोका) अंतर्गत कारवाई करण्यात आली. यासोबतच ३५ गुन्हेगारांना स्थानबद्ध करण्यात आले, तर ३६८ गुन्हेगारांना शहरातून तडीपार करण्यात आले. या कठोर आणि सातत्यपूर्ण कारवायांमुळे गुन्हेगारीला मोठा आळा बसला आहे."

अवैध धंद्यांवरही पिंपरी-चिंचवड पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर कारवाई केली आहे. एका वर्षात तब्बल ५ हजार ८१८ अवैध धंद्यांबाबत गुन्हे नोंदवण्यात आले असून, त्यातून १६ कोटी ३७ लाख ११ हजार ४८२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. "अवैध दारू, जुगार, मटका, ऑनलाइन सट्टा आणि इतर बेकायदेशीर धंद्यांवर कठोर कारवाई सुरूच राहणार आहे," असा इशारा आयुक्तांनी दिला.

शहरातील कायदा-सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी 'व्हिजिबल पोलिसिंग'वर भर देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. "पिंपरी-चिंचवड हद्दीत एक हजार ४५ संवेदनशील ठिकाणे निश्चित करण्यात आली असून, त्या ठिकाणी सातत्याने पेट्रोलिंग सुरू आहे. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसण्यास मदत होत आहे," असे चौबे यांनी नमूद केले.

पोलीस दलाच्या बळकटीकरणाबाबत माहिती देताना आयुक्त चौबे म्हणाले की, मागील वर्षी एक अपर पोलीस आयुक्त, तीन पोलीस उपायुक्त आणि सहा सहायक पोलीस आयुक्त अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पदांना मान्यता मिळाली. तसेच उत्तर महाळुंगे, चाकण दक्षिण, दापोडी, बावधन, काळेवाडी आणि संत तुकाराम नगर या सहा नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्यात आली. या नव्या पोलीस ठाण्यांसाठी आठ पोलीस निरीक्षक, १२ सहायक पोलीस निरीक्षक, २६ पोलीस उपनिरीक्षक, २८२ कॉन्स्टेबल आणि चार सफाई कामगार अशा एकूण ३३२ पदांना मान्यता देण्यात आली आहे. या बदलांमुळे झोन रचनेतही बदल करून चौथा झोन नव्याने तयार करण्यात आला आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि मदतीसाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी 'ज्येष्ठानुबंध' ही अभिनव सेवा सुरू केली आहे. "या ॲप्लिकेशनद्वारे ज्येष्ठ नागरिक पोलिसांकडे थेट मदत मागवू शकतात. घरातील सामान आणणे, रुग्णालयात ने-आण, औषधे मिळवून देणे, तातडीची मदत अशा विविध सेवा पोलिसांकडून दिल्या जात आहेत," असे आयुक्तांनी सांगितले. आतापर्यंत आयुक्तालयाच्या हद्दीतील २२ हजार ज्येष्ठ नागरिकांनी 'ज्येष्ठानुबंध'मध्ये नोंदणी केली असून, या ॲपमध्ये सरकारी योजना, जवळची सरकारी रुग्णालये आणि इतर आवश्यक माहितीही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत आयुक्त चौबे यांनी 'ट्राफिक बडी' या संकल्पनेची माहिती दिली. मागील वर्षी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत आतापर्यंत ८ हजार २५७ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ६ हजार ५३३ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून, १ हजार ७०८ तक्रारी नाकारण्यात आल्या आहेत, तर १६ तक्रारींवर काम सुरू आहे. "वाहतुकीचे नियम मोडणे, बेशिस्त पार्किंग, वाहतूक कोंडी, खराब रस्ते आणि अवजड वाहनांबाबत सर्वाधिक तक्रारी येतात," असे त्यांनी सांगितले.

### पिंपरी-चिंचवड पोलिसांची वार्षिक कामगिरी सादर

सामाजिक बांधिलकी जपत पिंपरी-चिंचवड पोलिसांनी पूरग्रस्तांसाठी ४४ लाख रुपयांची मदत दिली आहे. तसेच १३६ पोलीस पाल्यांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांनी विशेष प्रयत्न करत सायबर फसवणुकीतून लुबाडले गेलेले २४ कोटी ३८ लाख ५९ हजार ८४२ रुपये पीडित नागरिकांना परत मिळवून दिले आहेत. यासोबतच सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. "गुन्हेगारी रोखण्यासाठी केवळ पोलिसांचीच नव्हे, तर नागरिकांचीही जबाबदारी महत्त्वाची आहे. नागरिकांनी सहकार्य केल्यास पिंपरी-चिंचवड शहर अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि शांततामय बनेल," असा विश्वास व्यक्त करत पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

## निवडणूक आयुक्तांकडून ऑनलाईन निवडणुकीचा आढावा

### पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुका शांततेत भयमुक्त पार पाडण्याच्या सूचना

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी ऑनलाईन बैठकीद्वारे महापालिका प्रशासनाकडील निवडणूक तयारीचा सविस्तर आढावा घेतला. महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी निवडणूक प्रक्रिया शांततेत, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी करण्यात आलेल्या विविध नियोजनात्मक बाबींची माहिती यावेळी बैठकीत दिली.**




पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ मतदान होणार असून मतमोजणी १६ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. या निवडणुकीसाठी एकूण ६९१ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे असून, या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासनामार्फत सर्वंकष तयारी करण्यात आली असून याबाबत आज राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी आढावा घेतला. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, आचारसंहिता कक्षप्रमुख उपजिल्हाधिकारी सुरेखा माने यांच्यासह महापालिकेचे सह आयुक्त मनोज लोणकर, स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार, सहायक नगररचनाकार प्रशांत शिंपी, उपायुक्त व्यंकटेश दुर्वास, अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड आदी उपस्थित होते. बैठकीत मतदार यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया, संभाव्य दुबार मतदान टाळण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना, स्ट्रॉंग रूमची सुरक्षित व्यवस्था, मतमोजणी केंद्रांची आखणी, तसेच निवडणूक कालावधीत माहिती संकलन व प्रसारासाठी स्थापन करण्यात आलेल्या मीडिया सेलच्या कार्यपद्धती याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण प्रक्रिया सुरू असून, उमेदवारांच्या निवडणूक खर्च तपासणीची कार्यवाही प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. तसेच मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मतदान जनजागृती कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्यासोबत नियमित बैठकांचे आयोजन करण्यात येत असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. मतदारांच्या तक्रारींच्या तात्काळ निवारणासाठी तक्रार निवारण केंद्र, तसेच प्रसारमाध्यमांमधील जाहिराती व बातम्यांवर देखरेख ठेवण्यासाठी प्रसार माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती (एमसीएमसी) प्रभावीपणे कार्यरत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.




# भूक, भक्ष्य, भक्षक!

**म्हणजे मग नियम नाहीसे होऊन नियमभंगाचा धोका टळेल. शिवाय आम्ही म्हणू तसा आणि तोच विकास असे एकदा जाहीर झाले, त्याच्या आड येणाऱ्या प्रत्येकाला पर्यावरणविरोधी ठरवून टाकले गेले की उजळ माथ्याने सगळेच जंगल नष्ट करण्याचा कार्यक्रम हाती घेणे सोपे.**

आपण किती भाग्यवान! आपणास लाभलेले आहेत तसे आणि तितकी विकासाची भूक असलेले राजकारणी जगात अन्यत्र शोधूनही सापडणार नाहीत. ताडोबा-अंधारी प्रकल्पात वाघांच्या मार्गिकेतून खाणीस परवानगी देण्यामागेही ही विकासाची भूक हेच कारण आहे हे महाराष्ट्रातील बिनविरोध निवडणुकांस चटावलेल्या नागरिकांस सहजी लक्षात यावे. या भुकेचे महत्त्व समजून घेण्यासाठी अजित पवार म्हणतात त्या राक्षसी भुकेचा मुद्दा बाजूला ठेवू. सरकारात असलेले पण सध्या निवडणुकीच्या रिंगणात एकमेकांविरुद्ध दंड थोपटून उभे असलेले तीनही पक्षांचे सत्ताधारी 'ही' भूक कशी भागवायची ते नंतर आपसात ठरवतील. तूर्त मुद्दा आहे तो या एकत्रित सत्ताधाऱ्यांना लागलेल्या विकासाच्या भुकेचा. ती जंगल, त्यात राहणारे वाघ व इतर वन्यप्राणी यांस बेदखल करूनही भागवता येते किंवा काय, असा प्रश्न काही (अजूनही) शिल्लक चाणाक्षांस पडू शकेल. कारण सरकारचा ताजा निर्णय. त्यामुळे ताडोबा तसेच लगतचे राखीव



जंगल तसेच व्याघ्र प्रकल्पांना जोडणाऱ्या प्राण्यांच्या मार्गिकेतही लोहखनिज उत्खननाला परवानगी दिली जाणार असून हा निर्णय पर्यावरणाशी संबंधित सर्व तत्त्वांना तिलांजली देणारा असल्याचे आरोप होणार, हे उघड आहे. सरकारने ही निर्णयकृपा दाखवली नागपूरच्या एका पोलाद कंपनीने यासंदर्भात दिलेल्या प्रकल्प प्रस्तावावर. ही कंपनी कोणाची, तिचे संचालक कोण, सरकारमध्येच सामील असलेल्यांपैकी कोणाचा त्यात सहभाग आहे किंवा काय, यातून मिळणारा मलिदा कोणाच्या खिशात जाणार हे प्रश्न पडू देण्यात काहीही शहाणपण नाही. असल्या प्रश्नांची चर्चा किती निरर्थक ठरते हे अरवली पर्वतराजीबाबतच्या निर्णयांतून दिसून आले.पण चर्चा व्हायला हवी या निर्णयामुळे वन्यजीव आणि जंगलाची हानी होईल त्याची. मुळात जिथे जिथे व्याघ्र प्रकल्प आहेत आणि जंगलाला संरक्षित दर्जा मिळालेला आहे त्याच्या दहा किलोमीटरच्या परिसरात कोणतेही खाण प्रकल्प नको हा नियम. म्हणूनच तर या क्षेत्रास संवेदनशील क्षेत्र असा दर्जा दिलेला असतो. त्याकडे दुर्लक्ष करून, हा नियम धाब्यावर बसवून खाणींना परवानगी देण्याचे कारण काय? तेही ऐन निवडणुकीच्या धामधुमीत राज्य वन्यजीव मंडळाची बैठक बोलावून. सत्ताधाऱ्यांस विकासाची भूक इतकी अनावर झाली? वास्तविक राज्य तसेच केंद्र स्तरावर ही वन्यजीव मंडळे स्थापन झाली आहेत ती प्राण्यांचे संवर्धन व संरक्षण कसे करता येईल हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून. अलीकडे हा उद्देश मागे पडून या मंडळाच्या माध्यमातून खाणींचा मार्ग मोकळा करण्याचे प्रकार सर्रास सुरू झाले. या मंडळाच्या आधीच्या बैठकीतही हेच घडले. तेव्हाही ताडोबाजवळच्याच जंगलातील मारकी-मांगली गावात एका लोहखनिज प्रकल्पाला परवानगी देण्यात आली. आताही तेच घडते. ज्या लोहारडोंगरी भागात ही खाण होणार तो परिसर घनदाट जंगलाने वेढलेला आहे. आता मंजूर झालेला प्रस्ताव अमलात आल्यास तेथील ३५ हेक्टर जंगल कापून खाण प्रकल्प उभा राहील. त्याची भरपाई म्हणून त्याच्या बाजूला अधिक झाडे लावून नवे अभयारण्य उभारू असा सरकारचा युक्तिवाद. जो तद्दन फालतू या सदरात मोडणारा. तेवढ्याच घनतेचे, तशीच परिसंस्था असलेले नवे जंगल उभारणे सरकारच काय, कोणालाही शक्य नाही. पर्यायी जंगल ही सरकारनिर्मित संकल्पनाच बोगस आहे. ठरवून, नियोजनातून सामाजिक वनीकरण शक्य आहे. अभयारण्य निर्मितीही शक्य आहे. पण जंगल असे सरकारी योजनेतून तयार करता येत नाही. जंगल नैसर्गिक असते आणि त्याची जोपासना हेच मर्त्य मानवाचे कर्तव्य असते. कारण तो पुढच्या पिढीचा ठेवा असतो. त्यावरच आता सरकार घाव घालू इच्छिते. आजवरचा सरकारी इतिहास चाळला तर मियावाकीसारखे काही जुजबी प्रयोग वगळता कुठेही अशी वनसंपदा कृत्रिम मार्गांनी उभी राहिलेली नाही. हे वास्तव ठाऊक असूनही सरकार आहे .

## प्रासंगिक »

### योमर्यादा २८च हवी!

*सरकारने पदांचा तपशील देण्यास विलंब केल्याने आयोगाकडून कधीच वेळेवर जाहिरात प्रकाशित केली जात नाही.*

पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर कुणालाही परीक्षा देता येते. पण पदवीसाठीचे साधारण चार वर्षाचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एमपीएससीच्या परीक्षेची तयारी करण्यासाठी किती वर्षे द्यायला हवीत याचे एक नियोजन विद्यार्थ्यांनी करायलाच हवे. परीक्षा समजून घेण्यास एक वर्ष गेले असे आपण गृहीत धरूया, त्यानंतर कुठे अभ्यास कमी पडला किंवा इतर काही अडचणी मुळे निकाल एखाद-दोन गुणांनी राहून गेला असे गृहीत धरून आणखी फारतर चार वर्षे तुम्ही घ्यायला हरकत नाही चाळिशीपर्यंत, केवळ 'वयोमर्यादेत बसता येते' म्हणून जर कुणी या परीक्षेची तयारीच करीत राहिले तर त्याला काहीएक अर्थ उरत नाही. कितीही वर्षे तयारी करायची आणि परत वय वाढवून द्या म्हणून आंदोलनासारख्या कुबड्याचा आधार घ्यायचा हे साफ चुकीचे असून विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

कोणताही माणूस सदासर्वकाळ भूतकाळ जगू शकत नाही. हे जसे खरे आहे तसेच कोणत्याही माणसाला इतिहासापासून पळूनही जाता येत नसते. अशावेळी माणसे एका चमत्कारिक स्थितीत अडकत असतात. यातून त्यांना बाहेर पडण्याचा एकच मार्ग असतो.

## 'सोमनाथ'च्या निमित्ताने आणखी काही...

तो म्हणजे भूतकाळाचे सम्यक आकलन करून घेणे, आणि त्यावर स्वार होऊन त्या आधारे वर्तमानकाळ व्यवस्थित समजावून घेणे, त्यासाठी भूतकाळाचा एखाद्या गुरुकिल्लीसारखा उपयोग करणे. असे झाले नाही तर भूतकाळच माणसांची शिकार करण्याची शक्यताच अधिक असते.मानवी विकासक्रमात प्रत्येक समाजाचे प्रश्न कालानुक्रमे बदलत गेलेले असतात. जुन्या प्रश्नांची जागा नवे प्रश्न घेत असतात आणि त्यांच्या सोडवणुकीचे प्रकारही नवेच असतात. प्रत्येक व्यक्ती, मग ती सामान्य असो की असामान्य; प्रत्येक समाज, मग तो मागासलेला असो की सुधारलेला; ते सर्व इतिहासाची अपत्ये असतात आणि आपल्या वर्तमानातील परिस्थितीत ते आपल्या विवेकाच्या सहाय्याने हस्तक्षेप करून नवा इतिहास घडवीत असतात. परंतु त्यासाठी इतिहासात रमणे किंवा त्याचा अधिक्षेप करणे फारसे फलदायी ठरत नसते. त्यासाठी आपल्या स्वतःच्या आणि समाजाच्या



कर्तृत्वावर, त्याच्यातील सर्जनक्षमतेवर अतूट विश्वास असावा लागतो किंवा तो तसा निर्माण करावा लागतो. या विश्वास आणि भरवशामुळेच अनेक मागासलेले समूह कालौघात प्रभावशाली बनलेले जगाने पाहिले आहेत आणि त्यांनी पुढील पिढ्यांना आदर्श ठरावा असा इतिहास घडवलेलाही जगाने पाहिला आहे. त्यासाठी विवेकशक्तीची जागृती आणि तिच्याद्वारे इतिहासाचे सम्यक आकलन या दोन गोष्टी फार महत्वाच्या असतात. या पार्श्वभूमीवर, इतिहासाचे पुनर्वाचन केवळ ध्रुवीकरणाच्या राजकारणासाठी होऊ नये, ही अपेक्षा रास्त. सोमनाथ मंदिरावर पहिला हल्ला झाल्याच्या घटनेला एक हजार वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिलेल्या लेखाच्या वाचकांनाही ती लागू होते. पण या लेखाच्या वाचकांनी ४ जानेवारी १९५० च्या 'ऑर्गनायझर' या रा. स्व. संघाचे मुखपत्र समजले जाणाऱ्या नियतकालिकात पृष्ठ क्रमांक १२ ते १५ वर तत्कालीन सरसंघचालक एम. एस. गोळवलकर यांनी लिहिलेला लेख वाचला तर, मोदींनी सोमनाथची आठवण काढून काय साधले असा प्रश्न पडेल. त्या लेखात गोळवलकर गुरुजी लिहितात, "हजार वर्षांपूर्वी झगमगाट या विषयी गजनीच्या महंमुदला माहिती होती. त्या संपत्तीच्या लोभाने प्रेरित होऊन तो खैबरखिंड पार करून हिंदुस्थानवर चालून आला. सोमनाथवर हल्ला करण्यासाठी राजस्थानच्या वाळवंटातून जात असताना त्याच्यावर आणि त्याच्या सैन्यावर पिण्याच्या पाण्याअभावी तहानेने व्याकूळ होऊन तडफडायची वेळ आली होती. वाळवंटातून जाताना तापलेल्या वाळूचे चटके आणि उन्हाच्या झळांमुळे तो आणि त्याचे सैन्य तडफडून मेले असते. पण तसे झाले नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## संदीप देशपांडे नाराज का? नाराजीच्या चर्चांबाबत प्रश्न विचारताच देशपांडेंचं उत्तर

# स्वत:हून पक्षातून बाजूला होईन

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात सध्या महानगर पालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. राजकीय पक्ष जोमाने प्रचार करत आहेत. सर्वत राजकीय नेते दररोज वेगवेगळ्या ठिकाणी सभा घेत आहेत. मात्र या काळात अनेक नेते पक्षांतर करत असल्याचेही समोर आले आहे. राज ठाकरेंच्या मनसेतील डोंबिवलीतील अनेक पदाधिकाऱ्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीपूर्वी राज ठाकरेंची चिंता वाढली आहे. तसंच संतोष धुरी यांनी पक्ष सोडल्यानंतर संदीप देशपांडेंच्या नाराजीचीही चर्चा आहे. संदीप देशपांडे यांनी या सगळ्यावर भाष्य केलं आहे.**

## मला जबाबदारी दिली नाही





संतोष धुरीने पक्ष सोडल्यानंतर माझ्याशी चर्चा झाली नाही. जाहीरनामा-वचननामा करताना मला विश्वासात घेतलं नाही. मला जेव्हा एखादी जबाबदारी दिली जाते, तेव्हा मलाच का? असं विचारत नाही. जर मला जबाबदारी दिली नाही तर मी प्रश्न विचारु शकत नाही. राज ठाकरेंना वाटलं असेल की संदीप या गोष्टीसाठी फिट नाही, अमुक एक व्यक्ती चांगल्या प्रकारे चर्चा करु शकतो असं त्यांना वाटलं असेल. शिवाय सगळंच मला येतं असा माझा फाजील आत्मविश्वास नाही. माझ्यापेक्षा काही गोष्टी बाळा नांदगावकर, सरदेसाई चांगल्या करु शकतात. मी आक्रमक आहे, त्यामुळे गोष्टी बिघडू शकतात असंही त्यांना वाटलं असेल. मी त्या गोष्टी नीट हाताळू शकेन असं त्यांना (राज ठाकरे) वाटलं नसेल तर ठीक आहे. माझी काहीही तक्रार नाही. त्यात राग येण्यासारखं काही नाही असं संदीप देशपांडेंनी म्हटलं आहे. महाराष्ट्र टाइम्स ऑनलाइनला दिलेल्या मुलाखतीत संदीप देशपांडेंनी हे वक्तव्य केलं आहे. संतोष धुरीने त्याचा निर्णय घेतला तो चुकीचा की बरोबर हे मी सांगणार नाही. त्याला जे योग्य वाटलं ते त्याने केलं. उद्या जर मला असं वाटलं की माझ्या पक्षात ॲसेट नाही तर लायबेलिटी आहे तर मी स्वतःहून बाजूला होईन. माझा अट्टाहास असणार नाही की लायबेलिटी झालो तरीही मला पोसा, माझ्या पक्षात मी ॲसेट असेन तरच मी काम केलं पाहिजे. लायबेलिटी झालो तर मी काम नाही केलं पाहिजे. एखादा खेळाडूचा क्रिकेटमध्ये बॅटला बॉल लागत नाही, त्याला नीट खेळता येत नाही तर तो लायबेलिटी होतो, त्याने बाजूला झालं पाहिजे. मी कधी ॲसेट आहे आणि कधी लायबेलिटी हे मला देवाच्या दयेने कळेल आणि तेव्हा मी निश्चितपणे बाजूला होईन. एखाद्या पक्षात ॲसेट असणं गर्वाची गोष्ट आहे. आपल्यामुळे पक्षाला अडचण होते तर मग तुम्ही पक्षासाठी ओझं होता. अजूनपर्यंत माझ्यावर ही वेळ आलेली नाही, देव करो ती वेळ न येवो, पण जर वेळ आलीच तर काय निर्णय घ्यायचा मी घेईन, असं संदीप देशपांडेंनी म्हटलं आहे.राज्यात सध्या महानगर पालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. राजकीय पक्ष जोमाने प्रचार करत आहेत. सर्वत राजकीय नेते दररोज वेगवेगळ्या ठिकाणी सभा घेत आहेत. मात्र या काळात अनेक नेते पक्षांतर करत असल्याचेही समोर आले आहे. राज ठाकरेंच्या मनसेतील डोंबिवलीतील अनेक पदाधिकाऱ्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीपूर्वी राज ठाकरेंची चिंता वाढली आहे. तसंच संतोष धुरी यांनी पक्ष सोडल्यानंतर संदीप देशपांडेंच्या नाराजीचीही चर्चा आहे. संदीप देशपांडे यांनी या सगळ्यावर भाष्य केलं आहे. संतोष धुरीने पक्ष सोडल्यानंतर जाहीरनामा-वचननामा करताना मला विश्वासात घेतलं नाही. मला जेव्हा एखादी जबाबदारी दिली जाते, तेव्हा मलाच का? असं विचारत नाही.

### संदीप देशपांडे काय म्हणाले?

जर मला जबाबदारी दिली नाही तर मी प्रश्न विचारु शकत नाही. राज ठाकरेंना वाटलं असेल की संदीप या गोष्टीसाठी फिट नाही, अमुक एक व्यक्ती चांगल्या प्रकारे चर्चा करु शकतो असं त्यांना वाटलं असेल. शिवाय सगळंच मला येतं असा माझा फाजील आत्मविश्वास नाही. माझ्यापेक्षा काही गोष्टी बाळा नांदगावकर, सरदेसाई चांगल्या करु शकतात. मी आक्रमक आहे, त्यामुळे गोष्टी बिघडू शकतात असंही त्यांना वाटलं असेल.

# ओवेसी यांच्या सभेवर नाराजीचा झाकोळ

## बेशिस्त वर्तन खपवून न घेण्याचा ओवेसी यांचा इशारा...

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमआयएमच्या प्रदेशाध्याबरोबर बेशिस्तीचे वर्तन खपवून घेतले जाणार नाही. जर काळे धंदे करणारे आडवे येत असतील तर पोलिसांनी त्यांचा बंदोबस्त करावा, असे आवाहन करतो. पण पहायचेच असेल तर ' एमआयएम' ची ताकदही असे धंदे करणाऱ्यांनाही दाखवू असा इशारा ' एमआयएम' चे प्रमुख खासदार असदोद्दीन ओवेसी यांनी दिला.**



महापालिका निवडणुकीच्या त्यांच्या पहिल्या सभेवर पक्षातील नाराजांचा प्रभाव अधिक होता. त्यामुळे राजी – नाराजी पेक्षाही एकजूट होऊन आपले मत मांडण्याचा अधिकार देणाऱ्या लोकप्रतिनिधींना निवडा असे आवाहन त्यांनी केले.आमखास मैदानावरील सभेत बोलताना ओवेसी म्हणाले, की ' वंदे मातरम' वर संसदेमध्ये चर्चा घडत असतना कोणी तरी उठून बाबासाहेबांच्या संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आधार घेऊन बोलेल, असे वाटले होते. पण कोणी बोलले नाही. सगळे मुस्लिम खासदारही गप्प बसले. पण मुस्लिम असल्याचा गर्व असल्याचे सांगत संसदेच्या चर्चेत या विषयावर वेगळे मत मांडले. जर तुम्हाला असे मत मांडायचे असेल तर योग्य प्रतिनिधी निवडा.परिस्थिती नाजूक आहे. त्यामुळे पक्षातील अंतर्गत राजी नाराजींकडे लक्ष देऊ नका. छोट्या छोट्या गोष्टीत लक्ष घालाल तर वक्फ काळा कायदा डोक्यावर बसेल. त्यामुळे दिल्लीत जशी मशीद पाडली गेली. तसे सगळीकडे व्हायला वेळ लागणार नाही. मशिदी, दर्गे राहणार नाहीत. त्यामुळे झालेल्या चुकांपेक्षाही एकजूट महत्वाची आहे. चुका माणसांकडून होतात. पण जर चुकीचे लोकप्रतिनिधी निवडले तर योग्य ठिकाणी आवाज पोहचणार नाही, असेही ओवेसी म्हणाले. २१ माजी नगरसेवकांना तिकिटे न दिल्यामुळे असंतोष उफाळला होता. या पार्श्वभूमीवर बुधवारी एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांच्या गाडीवर हल्ला करण्याचाही प्रयत्न झाला. या पार्श्वभूमीवर जाहीर सभेत अंतर्गत नाराजीवर ओवेसी यांनी भाष्य केले. नाराजी असणारच आहे. माणसाकडूनच चुका होणार आहेत. पण नाराजीतून बंडखोरी निर्माण होणार नाही, असे प्रत्येकाने पहावे असेही ते म्हणाले.राष्ट्रवादी, भाजप यांना ही एकजूटच आवडत नाही. त्यामुळे एकजूट वाढवा असे ते म्हणाले. या वेळी हल्ला करणाऱ्या काळे धंदे करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई करावी अशी मागणी इम्तियाज जलील यांनी केली.

### पोलिसांनी बंदोबस्त करावा

नाराज असणाऱ्या नासेर सिद्दिकी यांनी ओवेसी यांच्या आदेशानुसार पुन्हा कामाला लागणार असल्याचे आवर्जून स्पष्ट केले. एमआयएमच्या प्रदेशाध्याबरोबर बेशिस्तीचे वर्तन खपवून घेतले जाणार नाही. जर काळे धंदे करणारे आडवे येत असतील तर पोलिसांनी त्यांचा बंदोबस्त करावा, असे आवाहन करतो.

## इराण ठरणार लक्ष्य? ट्रम्प यांच्या पुढील धोरणाबाबत तज्ज्ञाचा मोठा दावा

# व्हेनेझुएलानंतर इराण ठरणार लक्ष्य?

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मेरिकेने गेल्या शनिवारी पहाटेच्या सुमारास व्हेनेझुएलावर हल्ला करून राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेतले आहे. यानंतर अमेरिकेतील एक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि धोरण विश्लेषक जेफ्री सॅक्स यांनी गंभीर इशारा दिला आहे. मदुरो यांना ताब्यात घेण्यासाठी केलेल्या कारवाईनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प याचे पुढील लक्ष्य इराण असू शकते असे ते म्हणाले आहेत.**

## इराणमधील सरकार उलथवून टाकणार





भारतातील किमान दोन वृत्तवाहिन्यांशी बोलताना सॅक्स यांनी याबद्दलचे भाष्य केले आहे. सॅक्स म्हणाले की, इस्रायलला इराणचे वेड लागले आहे आणि त्यांनी असाही दावा केला की इस्रायलला हवे असलेले युद्ध अमेरिका लढतो. “मला अशी भीती आहे की पुढील क्रमांक इराणचा असेल. इराणवर नजर ठेवा. इस्रायलला इराणचे वेड लागले आहे आणि त्यांना इराणमधील सरकार उलथवून टाकायचे आहे. कोणत्या कारणामुळे ते १०० टक्के स्पष्ट नाही, पण अमेरिका मुळात इस्रायलच्या अधीन आहे. इस्रायल सांगतो, ते युद्ध अमेरिका लढतो. हे खरं तर प्रचंड डार्क आहे,” असे सॅक्स यांनी इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत म्हटले.सॅक्स यांच्या मते, २९ डिसेंबर रोजी डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी मार-ए-लागो येथे दिलेले संयुक्त निवेदनातून इराण पुढील लक्ष्य असल्याबद्दल सूचित करण्यात आले. सॅक्स यांनी इराणमधील आंदोलनाबाबत ट्रम्प यांनी केलेल्या विधानाकडेही यावेळी लक्ष्य वेधले.हल्ला करण्यासाठी एक प्रकारची स्टँडर्ड रणनीती वापरली जात असल्याचा दावा सॅक्स यांनी केला आहे. “ही उघडपणे एक विशिष्ट डीप-स्टेट चिथावणी होती- ‘इराणच्या लोकांचे रक्षण’ करण्यासाठी इराणवर आक्रमण करणे हा युक्तीवाद मानवी हक्कांशी जोडणे. हे एक स्टँडर्ड प्लेबुक आहे,” असे सॅक्स म्हणाले. गेल्या शनिवारी अमेरिकेच्या लष्कराने व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांच्या कराकस येथील निवासस्थानी छापा टाकला आणि त्यांना देशाबाहेर नेण्यात आले. यामुळे संपूर्ण जगात एकच खळबळ उडाली. बहुतेक देशांनी अमेरिकेच्या या कारवाईचा निषेध केला असला तरी, प्रत्यक्षात कोणीही काहीही करू शकले नाही.व्हेनेझुएलाची राजधानी कराकसमध्ये अमेरिकेने जे करून दाखवलं ते तेहरानमध्ये शक्य होईल का? तर जेफ्री सॅक्स यांच्या मते इराणवर आक्रमण करणे ही अमेरिकेची मोठी चूक ठरू शकते.“येथेच मला एका खऱ्या मोठ्या जागतिक स्फोटाची शक्यता वाटते. जर हे घडले तर ते व्हेनेझुएलापेक्षाही अधिक भीषण असेल. हे एकप्रकारे विनाशकारी असेल, कारण व्हेनेझुएला हा भौगोलिकदृष्ट्या अमेरिकेच्या जवळ आहे, आणि चीन किंवा रशिया तिथे अमेरिकेला आव्हान देऊ इच्छित नाहीत. मात्र, इराण हे अनेक शक्तींच्या मध्यभागी आहे. इराणकडे हायपरसोनिक क्षेपणास्त्रे आहेत आणि मोठ्या प्रमाणात नुकसान करण्याची क्षमता आहे. इस्रायल हा अण्वस्त्र असलेला देश आहे. एकंदरीत, ही एका मोठ्या संभाव्य आपत्तीची पूर्वतयारी ठरू शकते,” असेही त्यांनी इंडिया टुडेशी बोलताना सांगितले.इराणमध्ये महागाईचा भडका उडाला असून त्या विरोधात हजारो लोक रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. अमेरिका व पाश्चिमात्य देशांनी इराणवर निर्बंध लादल्याने इराणमध्ये डिसेंबर महिन्यात महागाई ४२.५ टक्क्यांनी वाढली आहे. इस्रायलबरोबर जूनमध्ये चाललेल्या सात दिवसांच्या संघर्षाचाही इराणच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे इराणमध्ये सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांना सत्तेवरून हटवण्याची मागणी जोर धरत आहे.

## इराणमध्ये नेमकं काय सुरू ?

यादरम्यान आंदोलक आणि सरकार यांच्यातील संघर्षात अनेकांचा मृत्यू झाला आहे.मेरिकेने गेल्या शनिवारी पहाटेच्या सुमारास व्हेनेझुएलावर हल्ला करून राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेतले आहे. यानंतर अमेरिकेतील एक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि धोरण विश्लेषक जेफ्री सॅक्स यांनी गंभीर इशारा दिला आहे.

# महिलांच्या उद्योग-व्यवसायात बेंगळुरू अव्वल

## देशाची आर्थिक राजधानी मुंबई दुसऱ्या, तर पुणे तिसऱ्या स्थानी...

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतातील कामकरी महिलांसाठी अनुकूल शहरांमध्ये, बेंगळुरूने २०२५ मध्ये सलग दुसऱ्या वर्षी अव्वल स्थान कायम राखले असल्याचे, कार्यस्थळ संस्कृतीबाबत सल्लागार सेवा प्रदात्या अवतार समूहाच्या सर्वेक्षणातील निष्कर्षांनी बुधवारी स्पष्ट केले.**

उल्लेखनीय म्हणजे महिलांसाठी सर्वात समावेशक उद्योग-व्यवसाय असणाऱ्या शहरांमध्ये देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई सलगपणे दुसऱ्या स्थानी ढकलली गेली आहे, तर पुणे या बाबतीत तिसरा क्रमांक पटकावला आहे. अवतार समूहाच्या सर्वेक्षणाचे यंदाचे हे चौथे वर्ष असून, देशातील १२५ शहरांमध्ये उद्योगातील कार्यसंस्कृती आणि महिलांच्या दृष्टीने सामाजिक समावेशकतेच्या अंगाने पाहणीअंती अव्वल १० शहरांची सूची तयार करण्यात आली आहे.महिलांचा कार्यबलात सहभाग, महिला कर्मचाऱ्यांची सुरक्षितता आणि करिअर सातत्य तसेच करिअर उत्कर्षाला समर्थन, या बरोबरीने धोरणकर्ते, समुदाय, संस्था आणि शहर प्रशासनाने महिलांसाठी अनुसरलेल्या सर्वोत्तम पद्धती या निकषांच्या आधारे हा शहरांचा समावेशकता



निर्देशांक तयार करण्यात आला आहे, असे अवतार समूहाच्या व्यवस्थापकीय संचालिका डॉ. सौंदर्य राजेश म्हणाल्या. मुंबई महानगर हे औद्योगिक सहभागितेत दुसऱ्या स्थानी जरी असले तरी सामाजिक सहभागात खूप पिछाडीवर पडल्याने, एकूण समावेशकता निर्देशांकात ते पाचव्या स्थानी घसरले आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत मुंबईची दोन पायऱ्यांनी घसरण झाली आहे, तर पुणे दोन पायऱ्यांच्या प्रगतीसह मुंबईपुढे तिसऱ्या स्थानावर आहे.

## एकंदरीत क्रमवारीत मुंबई पाचवी

देशातील इतर ठिकाणांहून स्थलांतरण आणि निवासासाठी या शहरांमध्ये सुयोग्य वातावरण असणे, शहर वाहतुकीची उत्तम पायाभूत सुविधा, परिवहन अशा सहाय्यक सेवा तसेच सुरक्षा यंत्रणा, सार्वजनिक सेवा आणि आरोग्य आणि शिक्षणाची उपलब्धता यासारख्या सामाजिक समावेशकता अव्वल शहरांच्या पथ्यावर पडली आहे.

औद्योगिक व सामाजिक अशा दोन्ही अंगाने सर्वात समावेशक पहिल्या पाच शहरांची क्रमवारी ही बेंगळुरू, चेन्नई, पुणे, हैदराबाद, मुंबई अशी आहे.

उल्लेखनीय म्हणजे पहिल्या १० शहरांमध्ये दक्षिण भारतातील पाच शहरे आहेत. तर उत्तर भारतातील एकमेव गुरूग्राम शहराला निर्देशांकात सहावे स्थान कमावता आले आहे. ७ ते १० व्या स्थानावर कोलकाता, अहमदाबाद, तिरुवअनंतपुरम, कोइम्बतूर या शहरांचा क्रम आहे.पूर्वापार अनेक नामांकित देशी आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या आस्थापना आणि कार्य जाळे अस्तित्वात असणे ही बेंगळुरू, मुंबई, पुणे, चेन्नई या सारख्या शहरांच्या पथ्यावर पडली असल्याचे डॉ. सौंदर्या म्हणाल्या.

# ‘लाखात एक आमचा दादा’ फेम अभिनेत्री रमली शेतकामात

मराठी कलाकार हे त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकतातच, पण अनेकदा या कलाकारांचा साधेपणाही चाहत्यांना भावतो. मराठी कलाकार हे ग्लॅमरस इंडस्ट्रीत काम करत असले; तरी अनेकदा ही कलाकार मंडळी आयुष्यात अगदी साधेपणाने जगत असतात. मालिका, चित्रपटात स्टार असणारे हे कलाकार वैयक्तिक आयुष्यात अगदी साधेपणाने आयुष्य जगत असतात. अशाच साधेपणा जपणाऱ्या लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे राजश्री निकम. राजश्री निकम या सोशल मीडियावर कायमच सक्रिय असतात. सोशल मीडियाद्वारे ते त्यांचे अनेक फोटो व व्हिडिओ शेअर करत असतात. त्याचबरोबर कामानिमित्तची माहितीही शेअर करत असतात. अशातच त्यांनी सोशल मीडियावर शेअर केलेला एक व्हिडिओ सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे.राजश्री यांनी शेअर केलेला हा व्हिडिओ शेतीकामाचा आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेल्या या व्हिडिओ त्या कापणी



करतानाचे दिसत आहे. हा व्हिडिओ शेअर करत त्यांनी शेती आणि एन्जॉय असंही म्हटलं आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये त्या आनंदाने शेतीकाम करत असतानाचे पाहायला मिळत आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेला व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.अनेकांनी या व्हिडिओला लाईक्स आणि कमेंट्सद्वारे चांगलाच प्रतिसाद दिला आहे. त्याचबरोबर अनेकांनी अभिनेत्रीच्या साधेपणाचंही कौतुक केलं आहे. अभिनेत्री अश्विनी महांगडेनेही राजश्री यांच्या या व्हिडिओवर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. अश्विनीने ‘ताई’ अशी कमेंट करत अभिनेत्रीच्या कृतीचं कौतूक केलं आहे. त्याचबरोबर अभिनेत्री सारिका नवाथे यांनीसुद्धा हा व्हिडिओ आवडला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.दरम्यान, राजश्री निकम या सध्या झी मराठी वाहिनीवरील ‘लाखात एक आमचा दादा’ या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत.

## दीपिका कक्करला ट्यूमर

टीव्ही अभिनेत्री दीपिका कक्कर दुसऱ्या टप्प्यातील यकृताच्या कर्करोगाने ग्रस्त आहे. एका महिन्यापूर्वी तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती ज्यामध्ये तिच्या यकृतातून टेनिस बॉलच्या आकाराचा ट्यूमर काढण्यात आला होता. अलीकडेच दीपिका पुन्हा पती शोएब इब्राहिमसह रुग्णालयात गेली होती. आता एका नवीन व्लॉगमध्ये शोएब इब्राहिमने खुलासा केला आहे की ट्यूमर शस्त्रक्रियेदरम्यान दीपिकाच्या यकृताचा काही भाग देखील कापावा लागला.नवीन व्लॉगमध्ये, दीपिका कक्कर आणि शोएब इब्राहिम त्यांचा मुलगा रुहान आणि पुतण्या हैदरसाठी खरेदी करताना दिसत आहेत. खरेदी केल्यानंतर घरी परतताना, दीपिका खूप थकलेली दिसते, ज्यावर शोएब म्हणतो “कधीकधी थकवा येतो आणि काहीही असो, शस्त्रक्रियेला फक्त एक महिना झाला आहे. यकृताचा एक भाग काढावा लागला.”शोएब इब्राहिम हाताने आकार दाखवत पुढे म्हणतो “तिच्या यकृताचा इतका भाग गेला आहे, इतका मोठा ट्यूमर आणि इतका भाग गेला आहे.”आज माझे टाके देखील काढले गेले आहेत.” मग शोएब म्हणतो “डॉक्टर म्हणत होते की कधीकधी असा दिवस येतो जेव्हा तुम्हाला काहीही करावेसे वाटत नाही.

## सोनालीचा मराठमोळा अंदाज!



मराठी कलाविश्वाची ‘अप्सरा’ म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णीला ओळखलं जातं. ‘नटरंग’, ‘हिरकणी’, ‘मितवा’, ‘पोश्टर गर्ल’ अशा बऱ्याच गाजलेल्या चित्रपटांमध्ये सोनालीने प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. अभिनेत्री सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. आपल्या वैयक्तिक जीवनातील प्रत्येक अपडेट सोनाली इन्स्टाग्रामवर शेअर करत असते. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. नुकताच अभिनेत्रीने शेअर केलेला डान्स व्हिडिओ सर्वत्र चर्चेत आला आहे. अलीकडच्या काळात सोशल मीडियावर नवनवीन गाणी व्हायरल होत असतात. सध्या इन्स्टाग्रामवर एका व्हायरल कवितेने सर्वांचं मन जिंकून घेतलं आहे. ही कविता वैभव जोशी आणि अमर ओक यांच्या ऋतू बरवा कार्यक्रमामुळे चर्चेत आली आहे. या कवितेच्या ओळी आहेत...या व्हायरल कवितेने सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळत आहे. सोनाली कुलकर्णीला देखील या गाण्याची भुरळ पडली आहे. सध्या सोनाली कामानिमित्त इंग्लंड दौऱ्यावर आहे. याठिकाणी मराठमोळा लूक करून सोनालीने व्हायरल गाण्यावर ठेका धरल्याचं पाहायला मिळत आहे.सोनाली लिहिते, “व्हायरल कवितेवर REEL व्हिडीओ बनवला नाही तर पाप लागेल...आणि ती संधी इंग्लंडमध्ये युरोपियन मराठी संमेलनच्या निमित्ताने मिळाली. अशी संधी मिळत असेल तर का बरं सोडावी?”सोनालीच्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांसह मराठी कलाकारांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. “खूप छान सोनाली मॅडम”, “पैठणीच्या कोणत्याही ड्रेसमध्ये ताई तू सुंदरच दिसतेस... आणि आज मराठमोळा लूक करून डान्स... कमाल”, “ट्रेंड सेटर सोनाली मॅम” अशा प्रतिक्रिया अभिनेत्रीने या व्हिडीओवर दिल्या आहेत.दरम्यान, सोनाली कुलकर्णीच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर येत्या काळात ती ‘मोगलमर्दिनी छत्रपती ताराराणी’ या सिनेमात प्रमुख भूमिका साकारताना दिसेल. हा सिनेमा कथालेखक आणि इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई या पुस्तकावर आधारित आहे.मराठी कलाविश्वाची ‘अप्सरा’ म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णीला ओळखलं जातं. ‘नटरंग’, ‘हिरकणी’, ‘मितवा’, ‘पोश्टर गर्ल’ अशा बऱ्याच गाजलेल्या चित्रपटांमध्ये सोनालीने प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. अभिनेत्री

## स्क्विड गेम 3’ च्या शेवटावर प्रेक्षकांची नाराजी

दक्षिण कोरियाची वेबसीरीज ‘स्क्विड गेम’ पहिल्या भागापासून ओटीटी विश्वात धुमाकूळ घालत आहे. २७ जून रोजी या मालिकेचा तिसरा आणि अखेरचा सीझन प्रदर्शित झाला. प्रदर्शन झाल्यानंतर या मालिकेने अनेक विक्रम मोडीत काढले आहेत. लाखो चाहत्यांनी बिंज वॉच केल्यामुळे नेटफ्लिक्सचे ॲप काही वेळासाठी क्रॅश झाल्याची बातमीही समोर आली होती. मात्र या सीझनचा शेवट अनेक चाहत्यांना आवडलेला नाही. त्यावरून आता टीका सुरू झाली आहे. दक्षिण कोरियातही याचे पडसाद उमटले असून थेट शेअर बाजारात स्क्विड गेमशी निगडित कंपन्यांच्या समभागात घसरण झाल्याचे पाहायला मिळाले. अखेर या सीरीजचे लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते ह्वांग डोंग-ह्युक यांनी नेटफ्लिक्स आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांना मुलाखत देऊन शेवट असा का केला? याची माहिती दिली.स्क्विड गेम वेबसीरीजमधील सर्वच पात्र हे या सीरीजचे सर्वात मोठे शक्तीस्थळ आहे. त्यांचे वैयक्तिक आयुष्य, त्याचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला परिणाम, संकट समोर असताना त्यांच्यातील समोर आलेले खरे रुप, माणुसकी, लोभ, लालसा आणि हिंस्रपणा या भावना मालिकेत पदोपदी ठासून भरलेल्या आहेत. त्याबरोबर मालिकेत खेळले जाणारे खेळ त्यात अजून रंगत भरतात. पहिल्या सीझनपासून मध्यवर्ती भूमिका असलेले प्लेअर नंबर. ४५६ अर्थात गि-हून हे पात्र प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे.अभिनेते ली जंग-जे यांनी स्क्विड गेममध्ये गि-हून हे पात्र साकारले आहे. त्यांच्या पात्राशी जगभरातील चाहते जोडले गेले असताना शेवटच्या सीझनमधील अखेरच्या भागात त्यांचा शेवट दाखविण्यात आल्यामुळे चाहते चांगलेच संतापले आहेत. पहिल्या सीझनप्रमाणे हॅप्पी एंडिंगचा कयास बांधलेल्या चाहत्यांना हा मोठा धक्काच होता. यातून दिग्दर्शक आणि निर्मात्यांवर टीका होऊ लागली. अखेर नेटफ्लिक्सला दिलेल्या मुलाखतीत दिग्दर्शकांनी यावर उत्तर दिले.लेखक, दिग्दर्शक ह्वांग डोंग-ह्युक, अभिनेते ली जंग-जे आणि फ्रंट मॅनचे पात्र रंगविणाऱ्या ह्वांग इन-हो यांनी नेटफ्लिक्सवर तिसऱ्या सीझनबाबत संवाद साधला.



## मानसी १० वर्षे टेलिव्हिजनपासून का दूर होती?

बॉलीवूडची क्वीन कंगना रणौत अभिनयासह तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. ती अनेक विषयांवर तिची मतं मांडत असते. लवकरच तिचा ‘इमर्जेन्सी’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिने भारताच्या माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. कंगना नेहमीच राजकीय विषयांवर आपले मत मांडत असते. दरम्यान नुकत्याच एका मुलाखतीत तिने राजकीय प्रवेशाबाबत वक्तव्य केले आहे.कंगनाने याआगोदर अनेकदा राजकारणात येण्याबाबत आपले मत व्यक्त केले आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये कंगनाने राजकीय प्रवेशाबाबत मत व्यक्त केले होते. ती म्हणाली होती “जर भगवान कृष्णाची इच्छा असेल तर मी लोकसभा निवडणुकाही लढवेन.”आता नुकत्याच एका मुलाखतीत कंगनाने पुन्हा एकदा राजकीय प्रवेशाबाबत मोठे वक्तव्य केले आहे.सध्या कंगना ‘इमर्जेन्सी’ चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. दरम्यान एका मुलाखतीत तिला तुला देशाची पंतप्रधान बनण्याची इच्छा आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचे उत्तर देत कंगना म्हणाली, ‘मी ‘इमर्जेन्सी’ नावाचा एकच चित्रपट केला आहे. तो चित्रपट पाहिल्यानंतर मी पंतप्रधान व्हावे असे कोणालाच वाटणार नाही. ‘इमर्जेन्सी’ हा आपल्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा आणि काळा अध्याय आहे.

## फाफने ८२ अर्धशतकं झळकावली — टी-२० मध्ये अशी कामगिरी ठरला पहिलाच फलंदाज

# फाफ डू प्लेसिसने मोडला वर्ल्ड रेकॉर्ड

## १२ हजार धावांचा टप्पा पार

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज खेळाडू फाफ डू प्लेसिस सध्या SA20 लीगमध्ये खेळत आहे. या स्पर्धेत खेळताना फाफने टी-२० क्रिकेटमध्ये ऐतिहासिक कामगिरी केली आहे. SA20 लीगमधील अत्यंत महत्त्वाच्या सामन्यात जोहान्सबर्ग सुपर किंग्सकडून खेळताना त्याने MI केपटाउनविरुद्ध जबरदस्त कामगिरी केली. यासह त्याने टी-२० क्रिकेटमध्ये अनोख्या विक्रमाला गवसणी घातली आहे.**





फाफने अवघ्या २१ चेंडूत ४४ धावांची तडाखेबंद खेळी केली. या खेळीच्या जोरावर त्याने टी-२० क्रिकेटमध्ये १२ हजार धावांचा टप्पा पार केला. हा पराक्रम करणारा फाफ जगातील दहावा खेळाडू ठरला आहे. आपल्या शानदार कारकिर्दीत फाफ डू प्लेसिसने ४०६ डावांमध्ये फलंदाजी करताना ८ शतकं आणि ८२ अर्धशतकं झळकावली आहेत. विशेष बाब म्हणजे, फाफने वयाच्या ४१व्या वर्षी हा विक्रम केला आहे. या वयात फारच कमी खेळाडू मैदानात उतरून अशी कामगिरी करू शकतात, त्यामुळे फाफची ही कामगिरी अधिकच कौतुकास्पद आहे.४१ वर्षे आणि १७८ दिवस वय असलेल्या फाफ डू प्लेसिसने टी-२० क्रिकेटमध्ये १२ हजार धावांचा टप्पा गाठत नवा इतिहास घडवला. या बाबतीत त्याने शोएब मलिक (४० वर्षे, ३१५ दिवस) आणि ख्रिस गेल (३९ वर्षे, ३१ दिवस) यांनाही मागे टाकलं. फाफचा फिटनेस आणि सध्याचा फॉर्म पाहता, तो अजूनही धावांचा पाऊस पाडू शकतो आणि पुढील काही वर्षे खेळतानाही आपल्याला दिसणार आहे.फाफने खेळलेल्या जवळपास प्रत्येक लीगमध्ये प्रभावी कामगिरी केली, मात्र त्याची सर्वोत्तम कामगिरी आयपीएलमध्ये पाहायला मिळाली. चेन्नई सुपर किंग्स (CSK) आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (RCB) अशा अनेक संघांकडून तो आयपीएलमध्ये खेळताना दिसला आहे. RCB कडून खेळताना त्याने कर्णधाराची जबाबदारीही सांभाळली आहे. मात्र IPL 2025 च्या लिलावापूर्वी RCB ने त्याला रिलीज केलं.यंदा फाफने आयपीएल न खेळण्याचा निर्णय घेत पाकिस्तान सुपर लीग (PSL) मध्ये खेळण्याचा पर्याय निवडला. त्यामुळे त्याची चमकदार आयपीएल कारकीर्द इथेच संपल्याची शक्यता आहे. आयपीएलमध्ये फाफने १५४ सामन्यांत ४,७७३ धावा केल्या असून, त्यात ३९ अर्धशतकांचा समावेश आहे.दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज खेळाडू फाफ डू प्लेसिस सध्या SA20 लीगमध्ये खेळत आहे. या स्पर्धेत खेळताना फाफने टी-२० क्रिकेटमध्ये ऐतिहासिक कामगिरी केली आहे. SA20 लीगमधील अत्यंत महत्त्वाच्या सामन्यात जोहान्सबर्ग सुपर किंग्सकडून खेळताना त्याने MI केपटाउनविरुद्ध जबरदस्त कामगिरी केली. यासह त्याने टी-२० क्रिकेटमध्ये अनोख्या विक्रमाला गवसणी घातली आहे.या खेळीच्या जोरावर त्याने टी-२० क्रिकेटमध्ये १२ हजार धावांचा टप्पा पार केला. हा पराक्रम करणारा फाफ जगातील दहावा खेळाडू ठरला आहे. आपल्या शानदार कारकिर्दीत फाफ डू प्लेसिसने ४०६ डावांमध्ये फलंदाजी करताना ८ शतकं आणि ८२ अर्धशतकं झळकावली आहेत. विशेष बाब म्हणजे, फाफने वयाच्या ४१व्या वर्षी हा विक्रम केला आहे. या वयात फारच कमी खेळाडू मैदानात उतरून अशी कामगिरी करू शकतात, त्यामुळे फाफची ही कामगिरी अधिकच कौतुकास्पद आहे.४१ वर्षे आणि १७८ दिवस वय असलेल्या फाफ डू प्लेसिसने टी-२० क्रिकेटमध्ये १२ हजार धावांचा टप्पा गाठत नवा इतिहास घडवला. या बाबतीत त्याने शोएब मलिक (४० वर्षे, ३१५ दिवस) आणि ख्रिस गेल (३९ वर्षे, ३१ दिवस) यांनाही मागे टाकलं. फाफचा फिटनेस आणि सध्याचा फॉर्म पाहता, तो अजूनही धावांचा पाऊस पाडू शकतो आणि पुढील काही वर्षे खेळतानाही आपल्याला दिसणार आहे.फाफने खेळलेल्या जवळपास प्रत्येक लीगमध्ये प्रभावी कामगिरी केली, मात्र त्याची सर्वोत्तम कामगिरी आयपीएलमध्ये पाहायला मिळाली. चेन्नई सुपर किंग्स संघांकडून तो आयपीएलमध्ये खेळताना दिसला आहे. RCB कडून खेळताना त्याने कर्णधाराची जबाबदारीही सांभाळली आहे.

### आयपीएलमध्ये प्रभावी कामगिरी


यंदा फाफने आयपीएल न खेळण्याचा निर्णय घेत पाकिस्तान सुपर लीग (PSL)मध्ये खेळण्याचा पर्याय निवडला. त्यामुळे त्याची चमकदार आयपीएल कारकीर्द इथेच संपल्याची शक्यता आहे. आयपीएलमध्ये फाफने १५४ सामन्यांत ४,७७३ धावा केल्या असून, त्यात ३९ अर्धशतकांचा समावेश आहे.दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज खेळाडू फाफ डू प्लेसिस सध्या SA20 लीगमध्ये खेळत आहे. या स्पर्धेत खेळताना फाफने टी-२० क्रिकेटमध्ये ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

# सचिनचा लेक बोहल्यावर चढणार

## अर्जुन-सानिया 'या' दिवशी लग्नबंधनात अडकणार

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा लेक अर्जुन तेंडुलकर २०२६ मध्ये बोहल्यावर चढणार आहे. तेंडुलकरांच्या घरी धाकट्या लेकाच्या लग्नसोहळ्याची लगबग पाहायला मिळेल. अर्जुन तेंडुलकर सानिया चंडोक हिच्याबरोबर लग्नगाठ बांधणार असल्याची माहिती रिपोर्टमध्ये समोर आली आहे.**





इतकंच नव्हे तर या दोघांच्या लग्नाची तारीखदेखील समोर आली आहे. लग्नाच्या दोन दिवसांपूर्वी लग्नापूर्वीच्या विधींना सुरूवात होणार आहे.अर्जुन तेंडुलकर व सानिया चंडोक यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये खाजगी सोहळ्यात साखरपुडा केला होता. दोन्ही कुटुंबीय व जवळचे मित्र मैत्रिणी यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला होता. तेंडुलकर व चंडोक कुटुंबियांनी गुपचूप साखरपुडा उरकल्यानंतर आता २०२६ मध्ये लग्नसोहळा पार पडणार आहे. टाईम्स ऑफ इंडियामधील एका वृत्तानुसार, अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चंडोक ५ मार्च २०२६ रोजी लग्न बंधनात अडकणार आहेत.

### तारीख आली समोर

ती मुंबईतील प्रसिद्ध उद्योगपती रवी घई यांची नात आहे. सानियाकडे पेट केअर ब्रँडची मालकिणदेखील आहे आणि ती तेंडुलकर कुटुंबाला खूप काळापासून ओळखते. सानिया ही सारा तेंडुलकर व अर्जुनची बालपणीची मैत्रिणदेखील आहे. सारा अनेकदा सानिया चंडोकबरोबर फोटो शेअर करत असते. इतकंच नव्हे तर तेंडुलकर कुटुंबांच्या कार्यक्रमांना व सहलींना देखील सानिया दिसली आहे.

लग्नापूर्वीचे विधी ३ मार्चपासून सुरू होतील. तर ४ मार्चला होळीचा सण देखील असणार आहे, त्यामुळे सणादरम्यान लग्नसोहळा असल्याने जोरदार सेलिब्रेशन होणार आहे.एका सूत्राच्या हवाल्याने वृत्तात म्हटलं आहे की, "लग्नाचे बरेचसे विधी मुंबईत होतील. जे ३ मार्च रोजी सुरू होतील आणि फक्त जवळचे मित्र आणि कुटुंबातील सदस्य कार्यक्रमांना उपस्थित राहतील." याबाबत अधिक माहितीसाठी सचिन तेंडुलकरच्या कुटुंबाशीही संपर्क साधला, परंतु सध्या कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

सानिया ही एक यशस्वी उद्योजिका आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। गुरुवार ।
दि. 8 जानेवारी 2026
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### प्रभाग क्रमांक 1 चिखली- म्हेत्रेवस्तीमधील नागरिकांची भावना

# कोविड काळात मानवतेचे कार्य म्हणून; आता सुरेशतात्या म्हेत्रे!

## मिशन – PCMC: कोविडच्या कठीण काळात प्रभाग क्रमांक 1, चिखलीमधील नागरिकांसाठी मानवतेचे कार्य




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोविडच्या कठीण काळात प्रभाग क्रमांक 1, चिखलीमधील नागरिकांसाठी माजी नगरसेवक सुरेश (तात्या) म्हेत्रे यांनी मानवतेचे अप्रतिम उदाहरण सादर केले. एका स्थानिक महिलेच्या पतीला संसर्ग झाल्यावर हॉस्पिटलमध्ये व्हेंटिलेटर उपलब्ध करून देणे, औषधांची सोय करणे आणि मानसिक तसेच आर्थिक आधार देणे – अशा संकटाच्या क्षणी तात्या म्हेत्रे यांनी धीर दाखवला. दुर्दैवाने त्या महिलेच्या पतीचे निधन झाले, तरी नंतरच्या आर्थिक आणि व्यावसायिक त्रासात तात्या म्हेत्रे यांनी पाठिंबा दिला. या कृतीमुळे स्थानिक नागरिक त्यांना वडिलासमान आदर देत आहेत.**

भाजपा नेते व आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्त्वाखाली, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रभाग क्रमांक 1 चिखलीत माजी नगरसेवक सुरेश म्हेत्रे आता निवडणुकीच्या रिंगणात आहेत. नागरिकांचे मत स्पष्ट आहे की, प्रभागातील प्रगतीसाठी आणि जनतेच्या हितासाठी सुरेशतात्या म्हेत्रे हे एकमेव व्यक्तिमत्व आहेत जे सतत लोकांसाठी काम करीत आहेत.

निवडणूक मार्गदर्शनानुसार, प्रभाग क्रमांक 1 मधील पहिल्या ईव्हीएम मशीनवरील अनुक्रमांक 2 वरील सुरेश (तात्या) रंगनाथ म्हेत्रे यांच्या नावासमोरील कमळ निशाणीवरील बटण दाबून त्यांना विजयी करावे, असे नागरिक सांगत आहेत. कोविड काळातील या मानवतेच्या कृतीमुळे आणि जनतेच्या हितासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे, सुरेशतात्या म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली चिखलीतील प्रगती, सेवा आणि नागरिकांशी घट्ट नाते कायम राहण्याची अपेक्षा सर्वांमध्ये दृढ आहे.V

# सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन उत्साहात

## शिक्षण विश्व: स्त्री शिक्षण व समाज सुधारकांचा गौरव



। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड : संत साई हायस्कूल, भोसरी येथे स्त्री शिक्षणाच्या प्रणेते आणि समाज सुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षक व विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण, धूप-दीप प्रज्वलन आणि मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आली. या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवलिंग ढवळेश्वर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणाविषयीचे विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. त्यांनी स्त्रियांचे विश्वातील योगदान महत्त्वपूर्ण असून त्याला सुरुवात करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचे कार्य सदैव स्मरणीय राहणार असल्याचे सांगितले.

शिवलिंग ढवळेश्वर यांनी विशेष करून सांगितले की, "एक स्त्री शिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंब साक्षर होते. स्त्री स्वावलंबी झाली तर समाजातही सकारात्मक बदल घडतात." त्यांनी विद्यार्थिनींना प्रोत्साहन देत, वाचनाला जास्तीत जास्त वेळ देण्याचे महत्त्वही अधोरेखित केले. शिक्षिका पूजा पावटेकर यांनी सावित्रीबाईंच्या सामाजिक कार्याचे गौरव करत विधवा, परित्यक्ता व अनाथांसाठी केलेल्या कार्याचे महत्त्व सांगितले. सूत्रसंचालन मालन लिगाडे आणि आभार प्रदर्शन रिया पोतदार यांनी केले. कार्यक्रमात लहान विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांची आठवण करून देणारी विशेष सादरीकरणे केली. त्या कपाळावर आडवी चीर बांधून, हातात पुस्तके घेऊन सावित्रीबाईंच्या वेशभूषेत समूह नृत्य आणि स्वयंरचित कविता सादर करत दिसल्या. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शन करून करण्यात आली. या वेळी शाळेच्या विश्वस्त पायल ढवळेश्वर, मुख्याध्यापिका सुनिता ढवळेश्वर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. सावित्रीबाई फुले जयंतीसह बालिका दिन साजरा करून शाळेने स्त्री शिक्षण व सक्षमीकरणाचे संदेश विद्यार्थिनींपर्यंत पोहोचवले.

## WTE कंपनीचा विधायक पुढाकार:

# महाळुंगे व चाकण वाहतूक विभागाला 100 बॅरेकेट्सची भेट!

### महाळुंगे व चाकण परिसरातील वाहतूक नियंत्रण सुलभ होणार"

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील महाळुंगे आणि चाकण वाहतूक विभागाला वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी करण्यासाठी WTE INFRA PROJECT PVT. LTD. या कंपनीकडून एकूण १०० वाहतूक बॅरेकेट्स प्रदान करण्यात आल्या.**






याप्रसंगी पोलिस प्रशासनाने सांगितले की, या बॅरेकेट्समुळे महाळुंगे व चाकण परिसरातील वाढती वाहतूक आणि औद्योगिक वसाहतींमुळे निर्माण होणाऱ्या ट्रॅफिक समस्यांवर नियंत्रण ठेवणे अधिक सुलभ होणार आहे. याशिवाय अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि वाहनचालकांमध्ये शिस्त निर्माण करणे यामध्येही मोठी मदत होईल. WTE INFRA PROJECT PVT. LTD. ने सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमाद्वारे पोलिस प्रशासनाला सहकार्य केले असून, पोलीस आयुक्तालयाने त्यांचे आभार मानले. भविष्यातही अशा प्रकारच्या उपक्रमांतून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सहकार्य अपेक्षित असल्याचे सांगितले.

वाहतूक बॅरेकेट्सच्या माध्यमातून वाहतूक व्यवस्थापन अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सुलभ होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

# पिंपळे सौदागरमध्ये भाजपच्या प्रचाराचा उत्सव

### प्रभाग क्रमांक 28; भाजप उमेदवार अनिताताई संदीप काटे यांचे फुलांची उधळण, औक्षण व घोषणांनी स्वागत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपळे सौदागर-रहाटणी परिसरातील प्रभाग क्रमांक २८ मध्ये भाजपच्या अधिकृत उमेदवार अनिताताई संदीप काटे यांच्या प्रचाराने सध्या उत्सवाचे स्वरूप धारण केले आहे. घराघरांत जाऊन मतदारांशी थेट संवाद साधताना नागरिकांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, ठिकठिकाणी फुलांची उधळण, औक्षण व घोषणांनी त्यांचे स्वागत करण्यात येत आहे.**




प्रचारादरम्यान अनिता काटे यांनी पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सुविधा तसेच महिलांच्या सुरक्षिततेसारख्या महत्त्वाच्या विषयांवर नागरिकांशी सविस्तर संवाद साधला. "विकासाचा अजेंडा पुढे नेण्यासाठी नागरिकांचा पाठिंबा अत्यंत आवश्यक आहे. मागील काळात प्रभागात झालेली विकासकामे आणि भविष्यातील नियोजन नागरिकांसमोर मांडत आहोत," असे त्यांनी सांगितले.

या प्रचारात भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी तसेच युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. ढोल-ताशांच्या गजरात, फलक व बॅनरच्या माध्यमातून प्रचाराला विशेष रंगत आली आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच तरुण वर्गाकडून अनिताताई काटे यांना सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

नागरिकांनी मांडलेल्या समस्या व सूचनांची तत्काळ नोंद घेऊन त्यावर प्रभावी उपाययोजना करण्याचे आश्वासन अनिता काटे यांनी यावेळी दिले. प्रभाग क्रमांक २८ मध्ये विकास, पारदर्शक कारभार व सातत्य राखण्यासाठी भाजपला संधी द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

## प्रभाग 8: इंद्रायणीनगरच्या विकासासाठी विजयाचा 'संकल्प'!

# सुसंस्कृत तुषार सहाणे यांच्या नेतृत्वावर स्थानिकांचा विश्वास

### आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दौऱ्याला विशेषतः महिला वर्गाकिडून उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**"तुषार सहाणे यांचे काम म्हणजे विश्वास, पारदर्शकता आणि सर्वसामान्यांचा आधार. प्रत्येकाला सोबत घेऊन, प्रत्येकाची बाजू समजून घेत समाजहिताची कामे करण्याची त्यांची पद्धतच त्यांची खरी ताकद आहे," अशा भावना इंद्रायणी नगर परिसरातील नागरिकांनी व्यक्त केल्या.**




आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ८ मधील जयगणेश साम्राज्य, समर्थ कॉलनी आणि इंद्रायणी नगर परिसरात तुषार सहाणे यांनी जोरदार प्रचार दौरा केला असून, या दौऱ्याला विशेषतः महिला वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

प्रचारादरम्यान तुषार सहाणे यांनी महिलांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी, समस्या आणि अपेक्षा जाणून घेतल्या. केवळ आश्वासनांपुरते न थांबता, महिलांच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना राबवण्याची ग्वाही त्यांनी दिली. "प्रभागातील प्रत्येक महिला स्वावलंबी झाली पाहिजे. महिलांसाठी उद्योगनिर्मिती, स्वयंरोजगार आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हेच माझे प्रथम प्राधान्य असेल," असे स्पष्ट आश्वासन त्यांनी दिले.

महाराष्ट्र कॉलनी परिसरात काढण्यात आलेल्या पदयात्रेदरम्यान महिलांनी तुषारभाऊंचे औक्षण करत त्यांना शुभाशीर्वाद दिले. "तुषारभाऊ आहेत म्हणूनच आमचा प्रभाग प्रगतीपथावर आहे," अशी भावना व्यक्त करत स्थानिक महिलांनी त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचा 'संकल्प' केला. ठिकठिकाणी झालेल्या जंगी स्वागतामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रचार दौऱ्यात तुषार सहाणे यांचा विकासाभिमुख दृष्टिकोन, स्थानिक प्रश्नांवरील ठाम भूमिका, संघटनात्मक कामाचा दांडगा अनुभव आणि समाजकार्याची तळमळ प्रकर्षाने दिसून आली. नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा मांडला. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, महिला सक्षमीकरण, युवकांसाठी रोजगाराच्या संधी यांसारख्या विषयांवर त्यांनी आपली स्पष्ट भूमिका मांडली. इंद्रायणी नगरसह संपूर्ण प्रभाग क्रमांक ८ मध्ये तुषार सहाणे यांच्या प्रचाराला मिळणारा वाढता प्रतिसाद आणि नागरिकांचा विश्वास पाहता, आगामी निवडणुकीत त्यांच्या विजयाबाबत आशादायक वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते व खंबीर समर्थक युवराज पालकर म्हणाले, "तुषारभाऊ केवळ लोकप्रतिनिधी नाहीत, तर कुटुंबातील सदस्याप्रमाणे प्रत्येकाच्या सुख-दुःखात धावून येतात. त्यांच्या कामाची पद्धत पारदर्शक असून विकासाची दूरदृष्टी त्यांच्याकडे आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेला असा नेता आमच्या प्रभागाला लाभला, हे आमचे भाग्य आहे. आम्ही सर्वजण शक्तीनिशी त्यांच्या पाठीशी उभे आहोत आणि त्यांचा विजय निश्चित आहे."



## पिंपरी गावात लोककला, भावना आणि प्रचाराची रंगतदार सांगड

# ‘आला रे आला वासुदेव आला!

## संदीप वाघेरे आणि राष्ट्रवादीच्या पॅनेलसाठी ‘कृतज्ञतेचा’ वासुदेव प्रचाररिंगणात

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीचा प्रचार सध्या चांगलाच रंगात आला असून, प्रभाग क्रमांक २१ (पिंपरी गाव) मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचाराने वेगळीच उंची गाठली आहे. नेहमीच्या पदयात्रा, सभा आणि भेटीगाठींसोबतच आता लोककलेच्या माध्यमातून प्रचाराचा अनोखा प्रयोग पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार संदीप वाघेरे, डब्बू आसवानी, प्रियंका कुदळे आणि निकिता कदम यांच्या प्रचारासाठी थेट ‘वासुदेव’ मैदानात उतरले असून, या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे संपूर्ण पिंपरी गावात उत्सुकता आणि चर्चेचे वातावरण निर्माण झाले आहे.**





विशेष म्हणजे हे वासुदेव स्थानिक नसून थेट बीड आणि बार्शी येथून पिंपरीत दाखल झाले आहेत. संदीप वाघेरे यांनी काही काळापूर्वी बीड–बार्शी परिसरातील आपत्तीग्रस्त नागरिकांना धान्य व जीवनावश्यक वस्तूंची मोठ्या प्रमाणावर मदत केली होती. त्या मदतीची आठवण ठेवत आणि कृतज्ञतेच्या भावनेतून तेथील लोककलावंतांनी स्वतःहून पिंपरी-चिंचवडमध्ये येत राष्ट्रवादीच्या पॅनेलसाठी प्रचार करण्याचा निर्णय घेतला आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन निर्माण झालेल्या या नात्याने प्रचाराला वेगळीच भावनिक धार मिळाली आहे.

> "आम्ही केवळ विकासकामेच केली नाहीत, तर लोकांची सुख-दु:खेही आपली मानली आहेत. आज ही मंडळी प्रेमापोटी लांबून आली आहेत, हेच आमच्या कार्याचे पावती आहे."
> — **संदीप वाघेरे,** (उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस)

प्रभाग २१ मध्ये सध्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पॅनेलचा जोरदार प्रचार सुरू आहे. घरोघरी भेटी, पदयात्रा, नागरिकांशी थेट संवाद यावर भर दिला जात असतानाच, वासुदेवांच्या आगमनाने प्रचाराला सांस्कृतिक रंग चढला आहे.

डफ आणि टाळांच्या तालावर “आला रे आला वासुदेव आला, ठेवू ध्यानात सारे चला... मतदान करू घड्याळाला,” अशा ओळी गात वासुदेव पिंपरी गावातील गल्लोगल्ली फिरत आहेत. पहाटेच्या शांत वेळेत आणि सायंकाळच्या गजबजलेल्या वातावरणात वासुदेवांच्या मंजूळ सुरांनी मतदारांचे लक्ष वेधून घेतले आहे. या लोककलेमुळे केवळ प्रचारच होत नाही, तर मराठी सांस्कृतिक वारशाचे दर्शनही घडत आहे. आधुनिक प्रचारतंत्रांच्या गदारोळात हरवलेल्या लोककलेला पुन्हा एकदा व्यासपीठ मिळाल्याने ज्येष्ठ नागरिकांसह तरुणांमध्येही कुतूहल निर्माण झाले आहे. अनेक ठिकाणी नागरिक थांबून वासुदेवांचे गाणे ऐकत आहेत, तर काहीजण मोबाईलवर व्हिडीओ चित्रीकरण करत हा क्षण जपून ठेवताना दिसत आहेत.

“साहेबांनी आम्हाला अडचणीच्या काळात माणुसकीच्या नात्याने मदत केली. त्या मदतीची परतफेड म्हणून आम्ही गाण्यांच्या माध्यमातून त्यांच्यासाठी आशीर्वाद मागायला आलो आहोत,” अशा भावना बीड–बार्शीहून आलेल्या वासुदेवांनी व्यक्त केल्या. या शब्दांमधून प्रचारापेक्षा कृतज्ञतेचा भाव अधिक ठळकपणे दिसून येतो.

या अनोख्या प्रचारामुळे मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. लाऊडस्पीकरच्या कर्कश आवाजापेक्षा वासुदेवांच्या सुरेल सादेने लोकांच्या मनाला हात घातला असून, प्रचार अधिक आपुलकीचा वाटू लागला आहे. या उपक्रमामुळे मतदानाची टक्केवारी वाढेल आणि नागरिक उत्स्फूर्तपणे मतदानासाठी बाहेर पडतील, असा विश्वास राष्ट्रवादीच्या उमेदवारांकडून व्यक्त केला जात आहे. याबाबत संदीप वाघेरे म्हणाले, “आम्ही केवळ विकासकामे केली नाहीत, तर लोकांची सुख-दुःखेही आपली मानली. अडचणीच्या काळात मदतीचा हात दिला आणि आज त्याच माणुसकीची परतफेड या लोककलावंतांच्या रूपाने मिळते आहे.

लांबून येऊन त्यांनी प्रेमापोटी आमच्यासाठी प्रचार करणे, हीच आमच्या कामाची खरी पावती आहे.” लोककला, कृतज्ञता आणि राजकीय प्रचार यांचा हा अनोखा संगम सध्या पिंपरी गावात चर्चेचा विषय ठरत आहे.

## आरोग्य समस्यांवरून शिवसेना उमेदवार आक्रमक

## प्रभाग 31 मध्ये प्रचाराची रणधुमाळी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**“जनतेच्या आरोग्याशी खेळाल, तर गाठ शिवसेनेशी आहे! लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या प्रशासकीय दिरंगाईला आता शिवसेनेच्या स्टाईलने उत्तर दिले जाईल,” असा कडक इशारा देत प्रभाग क्रमांक ३१ मधील शिवसेनेच्या उमेदवारांनी नवी सांगवीतील ड्रेनेजचा गंभीर प्रश्न धसास लावला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न सुटल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.**




### शिवसेना (धनुष्यबाण) पॅनेलचे अधिकृत उमेदवार

(अ) मनिषा आश्विन खुडे (अनुसूचित जाती)
(ब) प्रशांत बबनराव कडलग (नागरिकांचा मागासवर्ग)
(क) आरती संभाजी भेगडे (सर्वसाधारण महिला)
(ड) मेघराजराजे सिध्दार्थ लोखंडे (सर्वसाधारण)

बोरिंगचे पाणी झाले होते दूषित नागरिकांचे आरोग्य धोक्यात गेल्या अनेक वर्षांपासून ढोरे फार्म येथील ड्रेनेज लाईन फुटल्याने सांगवीतील नागरिक नरकयातना भोगत होते. हे सांडपाणी परिसरातील मोठ्या सोसायट्यांच्या बोरिंगमध्ये मिसळल्यामुळे पिण्याच्या पाण्याला दुर्गंधी येत होती. यामुळे नागरिकांना त्वचाविकार (SKIN INFECTION) आणि इतर गंभीर आजारांचा सामना करावा लागत होता. ही बाब शिवसेना उमेदवारांच्या निदर्शनास येताच, त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता संबंधित अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाचारण केले. तातडीने काम पूर्ण करण्याच्या कडक सूचना दिल्यानंतर ड्रेनेज दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे.

समाजकार्याला सत्तेची जोड द्या; विकासाचा शब्द प्रचारादरम्यान नागरिकांशी संवाद साधताना उमेदवार म्हणाले की, “गेल्या १५ वर्षांपासून आम्ही निष्ठेने निस्वार्थ समाजकार्य करत आहोत. पण समाजकार्याला सत्तेची जोड मिळाली तर प्रभागाचा विकास अधिक वेगाने आणि प्रभावीपणे करता येतो. तुमच्या हक्काचा, स्थानिक आणि हाकेला धावून येणारा नगरसेवक हवा असेल, तर आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा.”

### महिला सक्षमीकरणावर विशेष भर

निवडणूक जाहीरनाम्यात केवळ रस्ते आणि गटारेच नव्हे, तर महिलांच्या आर्थिक प्रगतीवरही भर देण्यात आला आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना घरबसल्या रोजगार उपलब्ध करून देणे, महिलांची सुरक्षा आणि त्यांचे स्वावलंबन ही आमची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे उमेदवारांनी स्पष्ट केले.

बालेकिल्ल्यात पुन्हा ‘भगवा’ फडकणार! नवी सांगवी हा शिवसेनेचा पारंपरिक बालेकिल्ला राहिला आहे.

“घेतला वसा लोकांच्या हिताचा, समाजसेवा हाच मनी ध्यास; सर्वांच्या साथीने करू प्रभागाचा सर्वांगीण विकास!” या ब्रीदवाक्यासह शिवसेना धनुष्यबाण पॅनेल मैदानात उतरले आहे. जनसंवाद सभांना मिळणारा प्रतिसाद पाहता यंदाही या बालेकिल्ल्यात भगवाच फडकणार असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.